## आतील पानात

- ट्रम्प यांच्या निर्णयामुळे व्यापार युद्ध भडकण्याची शक्यता...
- सोनबर्डी- एक धार्मिक तथा प्रेक्षणिय स्थळ
- योगासनात महाराष्ट्राच्या महिलांना सुवर्ण...

दैनिक

# अक्षराज

अचूक वेध, अचूक बातमी

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

वर्ष : ०४, अंक : १७५
पाने : ०४, किंमत : ०३ रुपये
संपादक : विनोद कैलास गोरे
RNI NO. : MAHMAR/2022/82056
Follow Us On : www.aksharaj.com
Email : newsaksharaj2021@gmail.com

बुलडाणा, बुधवार, दि.०५ फेब्रुवारी २०२५

## थोडक्यात

### कोयना जलाशयातील बुडीत बंधारेसाठी १७० कोटी

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०४, सातारा :** सातारा जिल्ह्यातील महाबळेश्वर व जावळी तालुक्यातील कोयना जलाशयामध्ये बुडीत होणारे २५ बंधारे बांधण्यासाठी १७० कोटी रूपयांची तरतूद करण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते.

कोयना जलाशय परिसरातील हे २५ बंधारे बुडीत क्षेत्रात येतात. या जलाशयाची पाणी पातळी फेब्रुवारी ते मे या महिन्यांच्या कालावधीत मोठ्या प्रमणात कमी होते. त्यामुळे या परिसरातील स्थानिक रहिवाश्यांना पिण्याच्या व सिंचनाच्या पाण्याची समस्या भेडसावते. ही समस्या सोडवण्यासाठी उपाययोजना म्हणून या बंधाऱ्यांचे बांधकाम करण्यात येणार आहे. त्यासाठी या बंधाऱ्यांच्या बांधकामांसाठी १७० कोटी रुपयांची तरतूद करण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत विशेष बाब म्हणून मान्यता देण्यात आली.

### मुंबई महापालिकेचा अर्थसंकल्प मुंबईकरांना दिलासा देणार

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०४, मुंबई :** मुंबई महापालिकेने कोणतीही करवाढ, शुल्कवाढ, भुर्दंडवाढ नसलेला अर्थसंकल्प सादर केल्याने सामान्य मुंबईकरांना दिलासा मिळाला आहे. सकारात्मक, विकासाभिमुख, विद्यार्थ्यांपासून ते चाकरमान्यांपर्यंत आणि गरीब कष्टकऱ्यांपासून ते उद्योजकांपर्यंत सर्व वर्गांच्या शिक्षण, आरोग्य, स्वच्छता आदी सुविधांचा विचार करणारा हा अर्थसंकल्प आधुनिक मुंबईचा शुभारंभ ठरेल, अशी प्रतिक्रिया उपमुख्यमंत्री शिंदे यांनी दिली.

मंत्रालयात मंत्रिमंडळाच्या बैठकीनंतर माध्यमांच्या प्रतिनिधींशी संवाद साधताना उपमुख्यमंत्री शिंदे बोलत होते. ते म्हणाले, मुंबई महापालिकेचा ७४ हजार ४२७ कोटी रुपयांचा अर्थसंकल्प सादर झाला. मुंबई वेगाने कात टाकत आहे. विकसित होत आहे. आम्ही दोन टप्प्यात मुंबईच्या रस्त्यांचे काँक्रिटीकरण केले. ग्लोबल मुंबईची चाहूल देणाऱ्या अर्थसंकल्पासाठी आयुक्त भूषण गगराणी आणि अतिरिक्त आयुक्त बांगर यांचं उपमुख्यमंत्र्यांनी अभिनंदन केले. भविष्यासाठी मुंबई वेगाने कात टाकतेय हे या अर्थसंकल्पातून स्पष्ट होईल, असे सांगत उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले की, अर्थसंकल्पात ४३ हजार कोटी विकासकामांवर खर्च होणार आहेत. त्यावरुन मुंबईचा विकास राज्य सरकारने आणि केंद्र सरकारने किती गांभीर्याने घेतला आहे, हे दिसून येते. भांडवली खर्चातली ही वाढ विक्रमी असून येत्या आर्थिक वर्षात महापालिकेच्या उत्पन्नात सात हजार कोटींनी भर पडली आहे त्याबद्दल उपमुख्यमंत्र्यांनी प्रशासनाचे कौतुक केले. 'बेस्ट' साठी एक हजार कोटींची तरतूद करण्यात आली आहे. मुंबईतल्या पर्यटनाला चालना देतानाच इथला प्रवास वेगवान करण्यावरही भर देण्यात आलेला आहे. प्रदुषणमुक्त, खड्डेमुक्त आणि भ्रष्टाचार मुक्त मुंबई हा दिलेला शब्द खरा करून दाखवत आहोत. पंतप्रधान मोदी यांच्या नेतृत्वाखाली ग्लोबल मुंबई ही देशाचं फिनटेक कॅपिटल म्हणून आकाराला येत आहे. जगाच्या नकाशावर मुंबई दिमाखाने तळपताना दिसेल त्याचाच हा शुभारंभ असल्याचेही उपमुख्यमंत्री शिंदे यांनी यावेळी सांगितले.

# बाळाच्या पोटात बाळ! 'फिट्स इन फिटू' चा दुर्मिळ प्रकार

## या प्रकारावर डॉक्टरांचे नेमके म्हणणे काय?



**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०४, बुलढाणा :** बुलढाणा जिल्ह्यातील शासकीय रुग्णालयात सोनोग्राफी तपासणीमध्ये एका महिलेच्या गर्भातील बाळाच्या पोटात बाळ असल्याचे दिसून आले आहे. वैद्यकीय भाषेत त्याला (फिटूस इन फिटू) असे म्हणतात. वैद्यकीय क्षेत्रातील दुर्मिळ प्रकरणाची बुलढाण्यासह संपूर्ण राज्यात चर्चा आहे.

**'फिटूस इन फिटू' म्हणजे काय?**

बुलढाणातील शासकीय रुग्णालयात एका ३२ वर्षीय गर्भवती महिलेची आठव्या महिन्यात सोनोग्राफी केली असता महिलेच्या गर्भातील बाळाच्या पोटात बाळसदृश्य मांसाचा गोळा असल्याचे निदर्शनास आले. त्यानंतर डॉक्टर आणि तज्ज्ञांनी पुन्हा दोन ते तीन वेळा सोनोग्राफी केली. मात्र त्यात बाळाच्या गर्भात मांसाचा गोळा स्पष्टपणे दिसून आला. त्यानंतर डॉक्टरांनी जगातील विविध भागातील काही शोध प्रबंध तपासले असता त्यात या स्थितीला 'फिटूस इन फिटू' असे संबोधतात असे स्पष्ट झाले. हा दुर्मिळ प्रकार असून हा मांसाचा गोळा काही दोषांमुळे गर्भातील बाळाच्या पोटातच तयार होतो, असे निष्पन्न झाले.

**महाराष्ट्रासह देश-विदेशात किती प्रकरणांची नोंद?**

जगात फिटूस इन फिटूची सुमारे २०० प्रकरणांची नोंद आहे. त्यापैकी भारतात १० ते १५ प्रकरणे यापूर्वी नोंदवली आहे. महाराष्ट्रात मात्र अशा प्रकरणांची संख्या कमी असल्याचे स्त्री व प्रसूतीरोग तज्ज्ञांचे म्हणणे आहे. जगात १८०८ मध्ये जॉर्ज विलियम्स यंग यांनी या पद्धतीच्या पहिल्या प्रकरणाची नोंद केली.

तर भारतात एप्रिल २०२३ मध्ये, बनारस हिंदू विद्यापीठाच्या सर सुंदरलाल रुग्णालयात या पद्धतीच्या एका प्रकरणाची नोंद झाली. या १४ दिवसांच्या बाळावर शस्त्रक्रिया करून त्याच्या पोटातून ३ गोळे बाहेर काढण्यात आले.

**मांसाचा गोळा तयार होण्याचे कारण काय?**

साधारणपणे महिलांमध्ये जुळ्या गर्भधारणेत हा प्रकार आढळत असल्याचे तज्ज्ञांचे म्हणणे आहे. संबंधित महिलेच्या गर्भाच्या पेशींमध्ये विभाजन होताना, अगदी सुरुवातीच्या काळात असमान विभाजन झाले तर अशा प्रकारचा गर्भ बांडगुळासारख्या सामान्य गर्भातील बाळाच्या पोटात विकसित होतो. त्याची हळूहळू वाढ झाल्यावर तो सोनोग्राफीमध्ये दिसू लागतो.

**आई-बाळाला संभावित धोके काय?**

फिटूस इन फिटूमुळे आई होणाऱ्या महिलेच्या गर्भात जास्त गर्भजल तयार होऊ शकते. त्यामुळे वेळेआधी प्रसूतीचाही धोका आहे. या महिलेला प्रसूतीदरम्यान जास्त रक्तस्राव होण्याचा धोका बळावतो. तर गर्भातील बाळाचे पोट फुगणे, ओकाऱ्या होणे, कावीळ, लघवी साचून राहणे, पोटात संक्रमण वा रक्तस्रावाचा धोका असतो. क्वचित प्रकरणांमध्ये मांसाच्या गोळ्याचे कर्करोगातही रूपांतर होऊ शकते, असे वैद्यकीय तज्ज्ञांचे मत आहे.

**गोळा कसा काढला जातो?**

महिलेची प्रसूती झाल्यावर बाळावर शस्त्रक्रिया करून मांसाचा गोळा (फिटूस इन फिटू) लवकरात लवकर शस्त्रक्रियेद्वारे काढावा लागतो. त्यानंतर भविष्यातही तज्ज्ञ डॉक्टरांकडून फेरतपासणी करावी लागते.

**ही स्थिती टाळता येऊ शकते काय?**

महिलेच्या गर्भात बाळाची वाढ होताना पेशींचे असमान विभाजन झाल्यामुळे फिटूस इन फिटू ही स्थिती निर्माण होते. पाच लाख बाळांमध्ये एखाद्या बाळात फिटूस इन फिटू ही स्थिती उद्भवत असल्याचे तज्ज्ञ डॉक्टरांचे म्हणणे आहे. त्यामुळे ही स्थिती टाळता येत नाही. परंतु ही स्थिती दुर्मिळ आहे.

**बुलढाण्यातील महिलेची स्थिती काय?**

जानेवारी अखेरीस बुलढाणा शहरात 'आईच्या पोटात बाळ आणि बाळाच्या पोटातही बाळ' असल्याचे निदर्शनास आले होते. महिलेची 'प्रसूती' सुरळीत झाली असून तिने एका मुलाला जन्म दिला आहे. सध्या दोघे मायलेक सुखरूप आहेत. लवकरच या नवजात बाळाच्या पोटातील मांसाचा गोळा काढून टाकण्यासाठी शस्त्रक्रिया होणार आहे. त्यासाठी अमरावती येथील शासकीय रूग्णालयात पाठवण्यात आले. तज्ज्ञांच्या देखरेखीत वरील शस्त्रक्रिया करण्यात येणार आहे.

**डॉक्टरांचे म्हणणे काय?**

फिटूस इन फिटू प्रकरणात महिलेच्या पोटात बाळ असल्याचे सोनोग्राफी चाचणीत निदर्शात येत असले तरी बहुतांश प्रकरणात हे बाळ जिवंत नसल्याचे पुढे आले आहे. त्यामुळे फक्त ते दिसायला बाळासारखे असते. परंतु त्याचे हृदयाचे ठोके नसतात. त्यामुळे याला मांसाचा गोळाही म्हटले जात असल्याचे नागपुरातील सुप्रसिद्ध स्त्री व प्रसूतीरोग तज्ज्ञ डॉ. सुषमा देशमुख यांचे म्हणणे आहे. दरम्यान, बाळाच्या जन्मानंतर लवकरात लवकर शस्त्रक्रियेतून हा मांसाचा तुकडा बाहेर काढणे गरजेचे असल्याचेही डॉ.देशमुख यांनी सांगितले.

# उल्हासनगर, अंबरनाथ आणि बदलापुरकरांची वाहतूक कोंडीतून सुटका होणार...

**अक्षराज : संजय पंडित**

**दि.०४, ठाणे :** ठाणे जिल्ह्याच्या विविध उपनगरातून मुंबईकडे दररोज प्रवास करणाऱ्यांसाठी आनंदाची बातमी आहे. एमएमआरडीए मुंबई आणि उपनगराला जोडणारा नवा एक्सप्रेस वे तयार करणार आहे, त्यामुळे अनेकांचा प्रवास सुकर आणि जलद होणार आहे. हा एक्सप्रेस वे मुंबई, नवी मुंबई, नवी मुंबई विमानतळ हायवेला कल्याण डोंबिवली, उल्हासनगर, अंबरनाथ आणि बदलापूरशी जोडला जाईल. या एक्सप्रेस वेवर ३ बोगदे असतील, तसेच पाच भुयारी मार्ग (अंडरपास) असतील. २० किमी लांब असणाऱ्या महामार्गावर चार इंजरचेंज असतील. या एक्सप्रेस वे च्या निर्मितीसाठी २०० हेक्टर जमीन अधीगृहण करावी लागणार आहे. त्यासाठी १०,८३३ कोटींचा खर्च लागेल, असा अंदाज आहे.

**एक्सप्रेस वे साठी टेंडर निघाले**

डोंबिवली, कल्याण, बदलापूर, अंबरनाथ आणि उल्हासनगर या शहरातील लोकसंख्या वेगानं वाढतेय. त्यामुळे अनेकदा वाहतूक कोंडीचा सामना करावा लागतो. नवीन होणारा एक्सप्रेस वेमुळे वाहतूक सुरळीत होण्यास मदत होणार आहे. मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने (एमएमआरडीए) नुकतेच नव्या एक्सप्रेस वेच्या निर्मितीसाठी टेंडर काढले आहे. बोगद्यासाठी सविस्तर अहवाल तयार करण्यासाठी टेंडर काढण्यात आलेय प्राप्त माहितीनुसार हा हायवे बदलापूर मधून सुरू असून मुंबई-दिल्ली, मुंबई-बडोदा, कटाई-बदलापूर आणि कल्याण रिंग रोड ला जोडला जाणार आहे. या एक्सप्रेस वे मधील पहिलं इंटरचेंज अंबरनाथमधील पालेगांव मध्ये असेल. दूसरे इंटरचेंज कल्याण पूर्वमधील हेदुत्ने येथे असेल. हा एक्सप्रेस वे कल्याण रिंग रोड आणि कल्याण शिळफाटा रोडला जोडला जाणार आहे.



नव्या एक्सप्रेस वे मुळे वेळ आणि अंतर दोन्ही वाचणार आहे. नवी मुंबई आणि कल्याण, ठाणे, बदलापूर आणखी जवळ येणार आहे. हा मार्ग नवी मुंबई आणि मुंबई उपनगरामधील अंतर कमी करण्यास मदत करेल. यामुळे ठाणे आणि आसपासच्या भागात वाहतूक कोंडीची समस्या देखील कमी होईल.

**दरम्यान ८ लेनचा हा एक्सप्रेस वे**

नवा एक्सप्रेस वे आठ लेनचा असेल असे सांगण्यात येतेय. ८० किमी प्रति तास वेगाने वाहन चालवले जाऊ शकते. या एक्सप्रेस वे साठी १७ फेब्रुवारी पर्यंत टेंडर भरता येईल. त्यानंतर कामाला सुरूवात होणार आहे.

अधिकृत माहितीनुसार नवी मुंबई आणि बदलापूरला जोडणाऱ्या या एक्सप्रेसवर तीन बोगदे आणि पाच अंडरपास असतील. याची लांबी २० किमी असेल. यामध्ये चार इंटरचेंजही असतील. एक्सप्रेस वेसाठी २०० हेक्टर जमीन द्यावी लागेल. त्यासाठी अंदाजे १०,८३३ कोटी रुपये खर्च होऊ शकतो.

# शिक्षण हक्कासाठी आज पेण बंदचे आवाहन : संदीप पाटील

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०४, पेण :** हक्काचे शिक्षण मिळावे या उद्देशाने सामजिक कार्यकर्ते संदीप रेणुका पाटील हे ३० जानेवारी पासून गागोदे बुद्रुक येथे बेमुदत सत्याग्रहासाठी बसले आहेत, मात्र प्रशासनाकडून त्यांच्या या सत्याग्रहाची दखल शासन दरबारी घेतली जात नसल्याने आता सत्यशोधक सर्वोदय संघटनेच्या माध्यमातून आज (दि.५ फेब्रुवारी) पेण बंदचे आवाहन करण्यात आले आहे.

देशातील तरुणांना तसेच बालकांना शिक्षण देणे ही शासनाची जबाबदारी असुन केन्द्र सरकार ही जबाबदारी झटकत आहे. त्याच प्रमाणे शिक्षणामध्ये विषमता, मर्यादित होत जाणारी शिक्षणाची संधी, महाग शिक्षण या विकृती निर्माण होत आहेत व यामुळे शिक्षण प्रवाहातून सर्वसामान्य, कष्टकरी व मध्यम वर्गाची मुले, आदिवासी मुले व मुली, अनुसूचित जाती जमाती, भटके विमुक्त, मुली व स्त्री वर्ग यांना शिक्षणातून बाहेर ढकलले जात आहेत आणि ही सर्व विचारधारा राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० मध्ये प्रतिबिंबित झालेली आहे त्यामुळे शाळा बंदचे धोरण म्हणजे स्कूल कॉम्प्लेक्स, क्लस्टर महाविद्यालये या योजना शिक्षणाची संधी बहुजनांना नाकारण्यात येत आहेत.

या मोफत शिक्षणाचा प्रश्न आपल्या सर्वांसाठी सोडविण्यासाठी संदीप रेणूका पाटील यांना पाठिंबा देवून आपल्या मुलांच्या शिक्षण हक्कासाठी पेण मधील सर्व नागरीक, विध्यार्थी वर्ग, युवा वर्ग, व्यापारी, उद्योजक, कष्टकरी जनता यांनी सदर बंद मध्ये सहभागी होण्याचे आवाहन सत्यशोधक सर्वोदय संघटनेच्या माध्यमातून करण्यात आले आहे.



## संपादकीय



### तानाजी मालुसरे

नरवीर तानाजी मालुसरे यांचा जन्म सन १६२६ साली गोडवली जि.सातारा येथे झाला. हे शिवाजी महाराजांच्या सैन्यातील एक सुभेदार व शिवाजी महाराजांचे बालपणीचे सवंगडी होते. तानाजीने महाराष्ट्रात शिवाजी महाराजांच्या स्वराज्य स्थापनेपासूनच अनेक महत्त्वाच्या घडामोडीत सहभाग घेतला होता. नरवीर तानाजी मालुसरे यांचे एक स्मारक रायगड मधील महाड तालुक्यामध्ये असणाऱ्या आंबेशिवथर गावामध्ये सर्व ग्रामस्थांच्या तसेच भारतीय लष्करामध्ये कार्यरत असणाऱ्या सैनिकांनी व गावातील शहरात असणाऱ्या नोकरदार वर्गाने पुढाकार घेऊन आपल्या वैयक्तिक निधीतून उभे करण्यात आले आहे. हे स्थान महाड पासून ३० किमी अंतरावर निसर्गसानिद्यात आहे. सातारा जिल्ह्यातील गोडवली गावात त्यांचे बालपण गेले. लहान पणापासूनच डोंगरदऱ्यांची माहिती असलेला हा तरुण. वडिलांच्या मृत्यूनंतर त्यांचे तारुण्य उंबरठ म्हणजेच त्यांचा शेलारमामा यांच्या गावी गेले. अफजलखानाच्या स्वारीच्या वेळी महाराजांनी काही निवडक सरदारांना प्रत्येकी हजार मावळ्यांचे सैन्य दिले होते. तानाजींनी या सैन्याच्या बरोबरीने खानाच्या फौजेवर तुटून पडून उत्तम कामगिरी बजावली होती. तानाजींचा मृतदेह किल्ल्यावरून ज्या मार्गाने कोकणात नेला त्या मार्गाला मढे घाट म्हणतात. स्वराज्यातील रायगडाच्या बाजूला, कोकण पट्ट्यात असणाऱ्या स्थानिक दंगलखोर जमातींचा बंदोबस्त करण्याची जबाबदारी महाराजांनी तानाजींवर सोपविली होती. त्यासाठीच या भागातील उमरठ या गावात येऊन ते राहिले होते. आपलेपणाने वागून या भागातील लोकांना स्वराज्याच्या कार्यात त्यांनी सहभागी करून घेतले.

सिंहगडची लढाई दि.४ फेब्रुवारी १६७० रोजी सिंहगड किल्ल्यावर, त्या काळात कोंढाणा म्हणून ओळखल्या जाणाऱ्या कोंढिन्यात रात्री दरम्यान झाली. मराठा साम्राज्याचा सेनापती तानाजी मालुसरे आणि सिंहगडचा राजपूत किल्लेदार उदयभानसिंग राठोड यांच्यात लढाई झाली. वेढा घेण्याच्या वेळी तानाजीने यशवंत घोरपडेच्या मदतीने किल्ल्याकडे जाणाऱ्या एका उंच खडकावर पचला. गडावर चढताना मराठ्यांना पहारेकऱ्यांनी रोखले होते आणि यावेळी पहारेकरी व काही घुसखोर यांच्यात लढाई झाली. उदयभान आणि तानाजी एकाच युद्धात गुंतले. उदयभानने तानाजीची ढाल फोडली आणि त्याची भरपाई केली. त्याने त्याच्या शेजारीच आपल्या पगडीचे कपड लपेटले आणि लढाई सुरूच ठेवली, लवकरच थोड्यावेळ उदयभानने त्याचे कवच तोडले. पण तानाजीने त्याचा सामना केला, ते दोघे युद्धामध्ये मारले गेले. दुसऱ्या मार्गावरून किल्ल्यावर प्रवेश केल्यावर मराठा सैन्याने किल्ला ताब्यात घेतला. नरवीर सुभेदार तानाजी मालुसरे यांच्या जीवनावरील आधारित तान्हाजी चित्रपट रिलीज झालाय. सिनेमा सगळीकडेच गर्दी खेचतोय. या निमित्ताने नरवीर तानाजी मालुसरे आणि त्यांच्या वंशजांविषयी कुतूहल आहे. त्यांचे वंशज कोण आहेत? ते काय करतात? त्यांचे वास्तव्य कोठे आहे? याबाबत माहिती मिळवण्यासाठी अनेकजण प्रयत्न करीत आहेत. नरवीर तानाजी मालुसरे यांचे थेट बारावे वंशज कै.शिवराज बाळकृष्ण मालुसरे यांच्या पत्नी डॉ.शीतल मालुसरे व त्यांचे पुत्र रायबा हे सध्या रायगड जिल्ह्यातील महाड येथे वास्तव्याला आहेत. डॉ.शीतल मालुसरे महाड येथे शिक्षिका म्हणून कार्यरत आहेत, तर मुलगा पुण्यात शिक्षण घेत आहे. डॉ. शीतल यांनी नरवीर तानाजी मालुसरे यांच्या इतिहासावर पीएचडी पूर्ण केली आहे. तसेच त्या राज्यात आणि राज्याबाहेर छत्रपती शिवाजी महाराज, नरवीर तानाजी मालुसरे यांच्या जीवनावर व्याख्याने देतात. तसेच कवियत्री म्हणून त्यांनी साहित्य क्षेत्रात स्वतःचा असा ठसा उमटवला आहे. तानाजींचे मूळ गाव कोणते? मालुसरे परिवार मुळचा कुठला? त्यांची पार्श्वभूमी काय? तानाजी मालुसरे यांच्या परिवाराचे पुढे काय झाले? याबद्दल जाणून घेण्याची अनेकांमध्ये उत्सुकता आहे. मालुसरे परिवार हा मूळचा पाचगणी जवळील गोडोली गावचा. तानाजी मालुसरे यांचे वडील काळोजीराव यांचे तेथे वास्तव्य होते. तानाजी मालुसरे यांचे बालपण गोडोली येथे गेले. शिवरायांनी बालपणातच स्वराज्य स्थापनेची शपथ घेतली तेव्हापासूनच तानाजी मालुसरे शिवरायांच्या सोबतच होते. तेथून पुढे शिवरायांच्या अनेक मोहिमा, लढायांमध्ये विश्वासू सहकारी म्हणून तानाजी सहभागी असत. त्यांच्यातील स्वराज्यनिष्ठा व लढवय्येपणा हेरून शिवरायांनी त्यांना महाबळेश्वर-पोलादपूर परिसरातील बंदोबस्ताची जबाबदारी सोपवली होती. त्यावेळी या भागात दरोडेखोरांचा मोठा उपद्रव वाढला होता. त्यांचा बंदोबस्त करण्यासाठी उमरठ या गावी ते आपल्या परिवारासह स्थायिक झाले. नंतर सन १६५९मध्ये प्रतापगडावर शिवराय व अफजलखान यांच्याबरोबर झालेल्या युद्धात त्यांनी अफजल खानाच्या सैन्याचा समाचार घेतला होता. नरवीर तानाजी अजरामर झाले ते सिंहगडाच्या लढाईत. सन १६६५मध्ये झालेल्या पुरंदराच्या मिर्झाराजे जयसिंगाबरोबर झालेल्या तहानुसार स्वराज्यातील २३ गड-किल्ले औरंगजेबाला द्यावे लागले होते. त्यात सिंहगडाचा देखील समावेश होता. परंतु पुढे महाराज मोठ्या शिताफतीने आग्र्याच्या कैदेतून सुटून आले. तहात दिलेले सर्व गड-किल्ले परत स्वराज्यात सामील करण्याचा सपाटा त्यांनी लावला.

# सोनबर्डी- एक धार्मिक तथा प्रेक्षणिय स्थळ

खानदेशातील जामनेर शहर हे भुसावळ तालुक्यापासून २५ किमी, जळगाव पासून ४१ तर अजिंठा पासून ४७ किमी अंतरावर आहे. जामनेर या शहरापासून जळगाव रस्त्याने जाताना डाव्या बाजूला साधारण दोन ते अडीच किमी व जळगावहून जामनेर शहरांमध्ये प्रवेश करतेवेळेस दोन ते अडीच किमी अंतर अगोदर एका बरड,(टेकडी)वर सोनबर्डीहे प्रेक्षणीय स्थळ वसले आहे. मुख्य रस्त्यावरून या प्रेक्षणीय स्थळावर जाततेवेळेस छान असा नागमोडी वळणाचा रस्ता आहे.

नागमोडी वळणाच्या दुतर्फा हिरव्यागार झाडी आहे. या झाडी मन मोहून घेतात. टेकडीवर पोहोचल्यावर अगदी समोर एक युद्ध भूमीवरील आधुनिक वाहन विक्रम नावाचा रणगाडा तयार केला आहे. तो बघून छाती गर्वाने फुलून येते. डाव्या बाजूला भली मोठी पाण्याची टाकी व हाकेच्या अंतरावर पूर्व दिशेला भव्य शिवमंदिर आहे. उजव्या बाजूला संगीतमय पाण्याच्या कारंज्या आहे. शिव मंदिराकडे जातेवेळेस पायऱ्यांच्या कडेला हिंदवी स्वराज्य संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या राज्याभिषेकाच्या ३५० व्या वर्षाचे औचित्य साधून, श्री सोमेश्वर महादेवाच्या सानिध्यात गीताधाम येथे पवित्र भगव्या ध्वजाची स्थापना ज्येष्ठ शुद्ध त्रयोदशी तथा हिंदू साम्राज्य दिन या दिवशी करण्यात आली.

दिनांक २ जून २०२३ वार शुक्रवार.असे फलक लावले आहे. अर्थात परम पवित्र भगव्या ध्वजाची स्थापना या दिवशी करण्यात आली आहे. शिव मंदिराकडे जाताना देखील नागमोडी वळणाचा रस्ता आहे. विटकरी रंगांच्या पायऱ्या चढल्यावर तेथील मोकळ्या मैदानावर हिरविगार गवताची चादर अंथरल्यासारखी वाटते. मैदानाच्या कडेला वेगवेगळ्या प्रकारचे सुवासिक व शोभिवंत फुलांची झाडे लावले आहे. त्यामुळे तेथील वातावरण अजूनच मनमोहक व प्रसन्न वाटते. निसर्गरम्य परिसराबरोबर छोट्या मंदिरात काला पाषाणातून साकारलेली नंदीची भव्य मूर्ती आहे. सहा ते सात पायऱ्या वर चढल्यावर तेथे गीताधाम आहे. गीताधामाच्या व्हरंड्यात भव्य पितळेची घंटा असून गोलाकार घुमट्याच्या आतील भागात आकर्षक चित्र रेखाटले आहेत. मंदिराचे भव्य प्रवेशद्वार सागाचे व देवस लाकडापासून बनवलेले असून त्यावर अतिशय बारीक कोरीव काम व गजराजाचे चित्र आहे. प्रवेशद्वारातून आत प्रवेश केल्यास ध्यानासाठी भव्य मंडप आहे व या मंडपातील गोलाकार घुमटाच्या आतील भागात छान भगवान शिवजींच्या लिलांचे चित्र काढले आहेत.समोरच संगमरवरी कलाकृतीने थाटलेले सोनेश्वर महादेव मंदिर आहे. मंदिर प्रवेशाच्या डाव्या बाजूला उत्तरमुखी गणेशजी व उजव्या बाजूला दक्षिणमुखी हनुमंत रायाची मूर्ती आहे. मुख्य गाभाऱ्यात भव्य काळ्या पाषाणातून साकारलेली



भव्य महादेवाची पिंड आहे. अतिशय मनमोहक अशी पिंड मन प्रसन्न करते. मंदिराच्या बाहेर डाव्या बाजूला निसर्गरम्य अशी शेकडो वेगवेगळ्या झाडा- फुलांनी सुशोभित केलेली मोकळी जागा आहे.तेथून उत्तर व ईशान्य दिशेला बघितल्यास जामनेर शहराचे दर्शन घडते.

सोमेश्वर मंदिरातून मनोभावे प्रार्थना करून बाहेर आले असता वीस ते पंचवीस पायऱ्या उतरून खाली आल्यावर साधारण दीडसे ते दोनशे मीटर अंतरावर डाव्या बाजूला नाना-नानीपार्क आहे. पार्कचे भव्य असे प्रवेशद्वार आहे. प्रवेशद्वारातून पंचवीस ते तीस पावलावर दर्शनी भागात छान पर्यटकांना बसण्यासाठी सिमेंट बांधकामातून उतरत्या छपराच्या छान झोपडी आहे. पार्कमध्ये जमिनीवर जागोजागी हिरव्यागार चादर अंथरल्यासारखं गवत पसरवलं आहे. आवश्यक त्या चढ -उताराच्या ठिकाणी पायऱ्या बसवल्या आहे. गोलाकृती असेलेलं बरड (बर्डी) शेकडो प्रकारच्या सुगंधित व काही शोभेच्या फुलांनी खूप फुलून दिसते.

डाव्या बाजूला मोकळ्या मैदानात मुलांना खेळण्यासाठी झोपाळे, घसरगुंड्या, दोरीवरील खेळ त्याचबरोबर बसण्यासाठीआकर्षक असे बाकडे आहेत.समोर गोलाकृती पाण्याचा छोटा कृत्रिम तलाव (डबके) बनवले आहे त्यामध्ये वेगळ्या रंगांचे सुंदर कमल पुष्प खूप शोभून दिसतात. सखल भागात सिमेंटच्या आकर्षक अश्या बाक व खुर्च्या बनवलेल्या आहे. झाडाच्या सावलीत हिरव्यागार गवतावर बसून जेवायला बसता येते. सहली निमित्ताने आलेली शाळकरी मुळे,तरुण तरुणी तसेच कुटूंबासह आलेली मंडळी छान बसून गप्पा, भेंड्या आणि गाणे म्हणून मनोरंजन करतात.दिवसभर सर्व पार्क फिरून झाल्याबरोबर तसेच भगवान शिवजींचे देवदर्शन झाल्यावर आनंद द्विगुणित करणारा अतिशय मनमोहक दृश्य म्हणजे कृत्रिम तलावातील संगीतमय पाण्यातील कारंजे (वॉटर फाउंटेन)...!कारंज्याचा आकार हा धनुष्याकृती आहे. संस्थान ह्या कारंज्या दररोज संध्याकाळी साधारण सहा साडेसहा वाजता चालू करतात.



जशी-जशी सूर्यास्ताची वेळ जवळ येते तास-तशी या कारंज्या विद्युत विजेच्या रोषणाईने वेगवेगळ्या रंगात अजूनही शोभून दिसतात. कृत्रिम तलावातील पाण्यामध्ये विद्युतविजेच्या रोषणाईचे व कारंज्याचे प्रतिबिंब अजूनच मन वेधून घेते. अतिशय सुंदर रचना या कारंज्यांची केली आहे. कारंज्या बघण्यासाठी बनवलेल्या पायऱ्याहून पूर्व दिशेकडे बघितल्यास सोनेश्वर शिवमंदिर सायंकाळी विद्युत रोषणाईने अजून शोभून दिसते.वेगवेगळ्या रंगांच्या विद्युत विजेच्या रोषणाईच्या छटा बदलतात त्यामुळे,खूपच आकर्षक वाटते. शिवाय नमः शिवाय नमः ह्या संगीतमय वातावरणात अधिक प्रसन्न वाटते.या मनमोहक धार्मिक तथा पर्यटन स्थळाच्या भेटीसाठी दिवसभरातून हजारो लोक येतात. शैक्षणिक सहली सुद्धा भेटी देतात. शाळकरी मुले निसर्गरम्य वातावरण, नाना-नानी पार्क, पार्कमधील खेळण्यांचा,कारंजांचा मनसोक्त आनंद लुटतात.

असे हे नापीक बरड (टेकडी) भगवान शिवजींच्या कृपेने व तेथील समस्त नागरिक,भाविक, सल्लागार समिती यांच्या संकल्पनेतून सोन्यासारखे तयार झाले आहे. या बरडाने वेगवेगळ्या सुगंधित, असुगंधित, शोभेच्या फुलांचे व शेकडो प्रकारच्या झाडा- झूडपांचे दागिने परिधान केले आहे त्यातून या पवित्र स्थळाला धार्मिक तथा प्रेक्षणीय स्थळाचे रूप प्राप्त झाले आहे. म्हणून हे स्थळ सोनेश्वर महादेवाची बर्डी म्हणून सोनबर्डी हे नाव नावारूपाला आले. खरोखरच अप्रतिम....! मनमोहक या प्रेक्षणीय स्थळाला शाळेतील मुले, महाविद्यालीयन तरुण -तरुणी यांनी शैक्षणिक सहलीच्या निमित्ताने व त्याचबरोबर दैनंदिन जीवनातील धावपळ, दगदग, नैराश्य घालवण्यासाठी मनाला प्रसन्न, आनंदी व प्रफुल्लित करण्यासाठी कार्यालयीन मित्र मंडळी किंवा कुटूंबातील सदस्यांसह सुट्टीच्या दिवशी अथवा आपल्याला सोयीप्रमाणे या धार्मिक तथा प्रेक्षणिय स्थळाला अवश्य भेट द्या.....!

**श्री.विनोद शेनफड जाधव**
**मासरूळ, जि.बुलडाणा**
**मो.९७६३२८२०७७**

## अंतर्याम..

मनात सलते सल
कपाळा लाव बाम
आजारपण संपेना
कधीकरणारं काम

सोसत ना शेंगदाणे
खाता काजू बदाम
ओझे झाले खिशा
खळखळतो छदाम

शेताकडे जावू राहे
तिकडे पडे आराम
जना वेगळे आपण
मिडीया घेई विश्राम

धारण केले मौनव्रत
सटकून सर्दीजुखाम
दाखवायचे जगाला
कर्म योगी निष्काम

सत्तेवाचूनकरमेचना
झालो पक्का गुलाम
सवय झाली सारखा
घेत रहायचा सलाम

बक्षीस हवे लक्षवेधी
नाटके करतो मुद्दाम
नाराज होते मजवर
खुर्ची भलती उद्दाम

कुणा कळेलं व्यथा
जाणा जरा अंतर्याम
साहेब रुजू कामावर
वाट पाहे जन तमाम

**- हेमंत मुसरीफ, पुणे**
**९७३०३०६९९६**

# ट्रम्प यांच्या निर्णयामुळे व्यापार युद्ध भडकण्याची शक्यता



अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी राष्ट्राध्यक्ष पदाची शपथ घेऊन ३० दिवसही उलटले नाहीत तोवर धडाकेबाज निर्णय घेऊन जगाला हादरवून सोडले आहे. राष्ट्राध्यक्षपदाच्या निवडणुकीतच त्यांनी अमेरिका फर्स्ट ही घोषणा केली होती.

अमेरिकेच्या हितासाठी जे काही करता येईल ते मी करेल त्यासाठी जगाशी लढावे लागले तरी बेहत्तर अशी घोषणा त्यांनी निवडणूकी दरम्यान केली होती. त्यांच्या याच घोषणेमुळे ते निवडून आले असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. आता राष्ट्राध्यक्षपदाची सूत्रे स्वीकारताच त्यांनी त्या दिशेने पावले टाकली आहेत. डोनाल्ड ट्रम्प यांनी मेक्सिको आणि कॅनडा या देशातून आयात होणाऱ्या वस्तूंवर २५ टक्के तर चीन मधून आयात होणाऱ्या वस्तूंवर १० टक्के अतिरिक्त कर लावला आहे.

त्यांच्या या निर्णयामुळे मेक्सिको, कॅनडा आणि चीन या देशांनाच नाही तर जगाला ही हादरा बसला आहे . कारण त्यांच्या या निर्णयामुळे आता जगात व्यापार युद्ध सुरू होईल अशी चिंता जाणकारांनी व्यक्त केली आहे. अमेरिकेने या तिन्ही देशांवर लावलेल्या अतिरिक्त करांना या तिन्ही देशांनीही जशास तसे उत्तर दिले आहे. मेक्सिकोच्या राष्ट्रपती क्लाडिया शिणबन यांनी आपल्या अर्थमंत्र्यांना देशहितासाठी अमेरिकन वस्तूंवर अतिरिक्त कर लावण्यास सांगितले आहे. कॅनडाने अमेरिकेचा निषेध व्यक्त करत अमेरिकन वस्तूंवर तितकाच म्हणजे २५ टक्के अतिरिक्त कर लावण्यात येईल असा इशारा दिला आहे. चीनही जागतिक व्यापार संघटनेमध्ये ट्रम्प यांना आव्हान देऊन प्रतीकात्मक पाऊल उचलण्याची शक्यता आहे. जगातील या चार मोठ्या देशात एक प्रकारे हे व्यापार युद्धच सुरू झाले आहे त्याचा परिणाम जागतिक अर्थव्यवस्थेवर होऊ शकतो परिणाम महागाई मोठ्या प्रमाणात वाढू शकते. ट्रम्प यांच्या या निर्णयाने जगातील सर्वच मोठ्या देशांचे धाबे दणाणले आहे. ट्रम्प यांची वक्रदृष्टी केंव्हाही आपल्यावर पडू शकते अशी भीती अनेक देशांना वाटू लागली आहे.

भारताने याबाबत जाहीरपणे चिंता व्यक्त केली नसली तरी भारतातही या निर्णयाचे सावट पसरले आहे. भारताने या निर्णयावर कोणतीही प्रतिक्रिया व्यक्त केली नाही मात्र भारत सावध पावले टाकत आहे हे नक्की. भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी हे पुढील महिन्यात अमेरिकेचा दौरा करण्याची शक्यता आहे.

त्यावेळी चर्चेत हा मुद्दा येऊ शकतो मात्र सध्या तरी भारताने सावध राहायला हवे. ट्रम्प कधी कोणता निर्णय घेतील याचा नेम नाही. आधीच त्यांच्या एका निर्णयाने अमेरिकेतील भारतीयांमध्ये अस्वस्थता पसरली आहे. ट्रम्प अमेरिकेतील बेकायदेशीर स्थलांतरितांना बाहेर काढण्याच्या तयारीत आहेत. अमेरिकेत कागदपत्र नसलेल्या स्थलांतरितांना बेकायदेशीर स्थलांतरित म्हणून संबोधले जाते. प्यू रिसर्च च्या अहवालानुसार अमेरिकेत ७. २५ लक्ष बेकायदेशीर भारतीय स्थलांतरित राहतात या बाबतीत भारत मेक्सिको आणि साल्वाडोर नंतर तिसऱ्या स्थानावर आहे. एका वृत्तानुसार अमेरिकन प्रशासनाने अमेरिकेत बेकायदेशीरपणे राहत असलेल्या भारतीयांना भारतात परत पाठवण्यासाठी एक योजना आखली असून त्यासाठी त्यांनी एक खास लष्करी विमान तयार ठेवले आहे. राष्ट्राध्यक्षपदी आरूढ झाल्यानंतर ट्रम्प यांनी घेतलेल्या या निर्णयामुळे जगात व्यापार युद्ध भडकण्याची शक्यता आहे त्याचा परिणाम जागतिक अर्थव्यवस्थेवर होणार आहे त्यामुळे जगभर खळबळ माजली आहे.

**- श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## बहुतांश नागरिकांनी स्वत: हून काढली अतिक्रमणे; अतिक्रमण कारवाईकडे नागरिकांचे लागले लक्ष

**अक्षराज : प्रमोद दिवेकर**

**दि.०४, वाघोली (पुणे) :** वाहतूक कोंडीवर उपाययोजना करण्यासाठी प्रशासनाने अतिक्रमणांवर सर्जिकल स्ट्राईक केल्यानंतर नगर रोड मोकळा श्वास घेत असतानाच कारवाईमध्ये होणाऱ्या नुकसानीच्या भीतीने केसनंद रोडवरील रस्त्याच्या कडेला असणारी अतिक्रमणे बहुतांश नागरिकांनी स्वतः हून काढली आहेत. त्यामुळे अतिक्रमण कारवाई पूर्वीच वाघोली केसनंद रोड मोकळा श्वास घेत आहे. पुणे-नगर रोडवर वाघोलीत होणाऱ्या वाहतूक कोंडीवर उपाययोजनाकरण्यासाठी प्रशासनाने सर्जिकल स्ट्राईक करून महामार्गाच्या कडेला असणारी अतिक्रमणे जमीनदोस्त करण्यास सुरुवात केली. महामार्गावरील कारवाईमध्ये काही अतिक्रमणे नागरिकांनी स्वतःहून अतिक्रमणे काढली आहेत. कारवाईच्या दणक्यानंतर महामार्ग मोकळा श्वास घेताना दिसत आहे. महामागर्निंतर सर्वाधिक वाहतूक कोंडी होणाऱ्या वाघोली-केसनंद रोडवर देखील प्रशासनाकडून कारवाई केली जाणार असल्याने कारवाईमध्ये होणाऱ्या नुकसानीच्या भीतीने रस्त्याच्या कडेची असणारी अतिक्रमणे बहुतांश नागरिकांनी स्वतः हून काढली आहेत. महामार्गा बरोबरच केसनंद रोडने मोकळा श्वास घेतला आहे. थोडकी राहिलेली अतिक्रमणे राहिली असल्याने केसनंद रोडवर अतिक्रमण कारवाईला कधी सुरुवात होणार याकडेच सर्वांचे लक्ष लागून राहिले आहे. केसनंद रोडसह महामार्गाला जोडणाऱ्या वाघोलीतील इतर रस्त्यांवरही कारवाई होणार असल्याने तेथील अतिक्रमणे नागरिकांनी काढून घेतली आहेत.

## शासकीय कार्यालयात मराठी सक्तीची: मराठी न वापरणाऱ्यांवर कारवाईचा इशारा

**अक्षराज : भानुदास गायकवाड**

**दि.०४, डोंबिवली (ठाणे) :** महाराष्ट्र सरकारने मराठी भाषेच्या संवर्धनासाठी मोठा निर्णय घेतला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील सरकारने राज्यातील सर्व शासकीय, निमशासकीय आणि महापालिका कार्यालयांमध्ये मराठी भाषेचा वापर बंधनकारक केला आहे. मराठीत कामकाज न करणाऱ्या कर्मचाऱ्यांवर शिस्तभंगाची कारवाई केली जाणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. मराठीला केंद्र सरकारने अभिजात भाषेचा दर्जा दिल्यानंतर तिचा प्रसार आणि जपणूक करण्यासाठी हे पाऊल उचलण्यात आले आहे. सरकारी कार्यालयांमध्ये दर्शनी भागात मराठी फलक अनिवार्य, संगणकावरील कळफलक मराठीत, तसेच सर्व पत्रव्यवहार, टिप्पण्या आणि आदेश मराठीतच असतील, असे आदेश देण्यात आले आहेत. महाराष्ट्र राजभाषा अधिनियम, १९६४ अंतर्गत संकेतस्थळे आणि सादरीकरणेही मराठीत असतील याची जबाबदारी जिल्हास्तरीय मराठी भाषा समित्यांना सोपवण्यात आली आहे. या निर्णयामुळे सरकारी यंत्रणेत मराठी भाषेचा प्रभाव वाढेल आणि तिचे संवर्धन होईल. अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## क्षयरोग निर्मूलनासाठी आय.जी पेट्रोकेमिकल इंडस्ट्रीकडून महापालिकेला मदत



**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.०४, पनवेल :** क्षयरोग मुक्त भारत करण्याच्या उद्देशाने पनवेल महानगरपालिका कार्यक्षेत्रात १०० दिवसीय क्षयरोग मोहीम राबविली जात आहे. क्षयरोगाच्या जास्तीत जास्त नवीन रुग्णांना त्वरित उपचाराखाली आणणे, क्षयरुग्णांचा मृत्यूदर कमी करणे, क्षयरोग सहवासितांना क्षयरोग प्रतिबंधक औषधोपचार देणे तसेच मोठ्या प्रमाणावर क्षयरोगाबाबत जनजागृती करण्याच्या उद्देशाने आयुक्त मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली सदर मोहीम राबविण्यात येत आहे. या पार्श्वभूमीवरती सामाजिक बांधिलकीच्या सीएसआर फंडाच्या माध्यमातून पालिकेस मदत करावी. असे आवाहन करीत दिनांक २६ डिसेंबर २०२४ रोजी तळोजा औद्योगिक संघटना, जवाहर औद्योगिक संघटना, पनवेल औद्योगिक संघटना यांच्या बरोबर बैठका घेण्यात आल्या होत्या. पालिकेने केलेल्या या आवाहनाला प्रतिसाद देत पनवेल महानगरपालिकेची १०० दिवसीय क्षयरोग मोहीम यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी दि.०३ फेब्रुवारी २०२५ रोजी आयजी पेट्रोकेमिकल इंडस्ट्रीच्या वतीने सामाजिक बांधिलकीतून, सीएसआर फंडातून, कार्यकारी संचालक सचिन जाधव यांनी ४ लाख रुपयांचा धनादेश आयुक्त मंगेश चितळे यांच्याकडे सुपूर्द केला. या रक्कमेचा उपयोग अधिक जोखमीच्या भागातील लोकांचे छातीचे एक्स-रे काढण्याकरिता वापरण्यात येणार आहे. माजी नगरसेवक सतिश पाटील यांच्या सहकार्यातून ही मदत पनवेल महानगरपालिकेला मिळाली आहे. यावेळी उपायुक्त डॉ.वैभव विधाते, मुख्य वैद्यकीय अधिकारी डॉ.आनंद गोसावी, माजी नगरसेवक सतिश पाटील, कुष्ठरोग अधिकारी डॉ.उषा राठोड आदी उपस्थित होते.

## बॅडमिंटन मधील मिश्र दुहेरीत रौप्यपदक



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०४, उत्तराखंड :** राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत महाराष्ट्राच्या जोडीला रुपेरी यशावर समाधान मानावे लागले. महाराष्ट्राच्या दीप रामभिया व अक्षया वारंग या जोडीने बॅडमिंटनमधील मिश्र दुहेरीत के.सतीश कुमार व आद्या वरीयथ या तामिळनाडूच्या अग्रमानांकित जोडीला चिवट लढत दिली. मात्र, हा सामना तामिळनाडूच्या जोडीने २१-११, २०-२२, २१-८ असा जिंकला.

परेड ग्राऊंड मधील हॉलमध्ये संपलेल्या मिश्र दुहेरीच्या अंतिम सामन्यात तामिळनाडूच्या सतीश व आद्या या जोडीने आजपर्यंत अनेक राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धांमध्ये अव्वल दर्जाची कामगिरी केली असल्यामुळे त्यांचे पारडे जड मानले जात होते. दीप व अक्षया हे प्रथमच या स्पर्धेत एकत्र खेळत होते. तरीही त्यांनी अंतिम फेरीत स्थान मिळविताना अतिशय चांगला खेळ केला. महाराष्ट्राच्या जोडीचे राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेतील पहिलेच पदक आहे.

# कार चालकाचा खून करणाऱ्या आरोपींना आळेफाटा पोलिसांनी केली अटक



**अक्षराज : प्रमोद दिवेकर**

**दि.०४, आळेफाटा (पुणे) :** पुण्यातून एर्टिका कार भाड्याने घेऊन नाशिकला जाताना त्या गाडीतील प्रवाशांनी आळेखिंडीत कार चालकाचा गळा आवळून खून करून कार चोरून नेल्याची घटना २७ जानेवारी रोजी घडली होती. या घटनेने जुन्नर तालुक्यात खळबळ उडाली होती. या गुन्ह्याच्या अनुषंगाने स्थानिक गुन्हे शाखा व आळेफाटा पोलिसांनी तपासाची सूत्रे हाती घेऊन सिसिटीव्ही फुटेज व आसपास चौकशी सुरु केली.

मृत कारचालक राजेश बाबुराव गायकवाड वय ५६ वर्ष यांचा मोबाईल पुणे नाशिक महामार्गावर संतवाडी येथील हॉटेल समाधान जवळ सापडला होता. त्यानुसार स्थानिक गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अविनाश शिळीमकर यांनी पथक स्थापन करून संपूर्ण महामार्गावरील सिसिटीव्ही फुटेज तपासण्यात आले.सदर एर्टिका कार माळशेज घाटाकडे गेली असून त्यामध्ये तिघेजण बसल्याचे आढळून आले. नंतर ही गाडी नाशिक जवळील कसारा घाटात सोडून देण्यात आली. या घटनेतील आरोपी हे नाशिक परिसरातील असल्याचे स्पष्ट झाल्यानंतर गोपनीय बातमीदारांकडून मिळालेल्या खबरीनुसार मुख्य आरोपी युवराज मोहन शिंदे (रा.सातपूर, जि.नाशिक), विशाल आनंदा चव्हाण, मयूर विजय सोळसे, ऋतुराज विजय सोनवणे हे तिघेही रा.गंगापूर रोड, नाशिक यांना अटक करण्यात आली. सर्व आरोपी हे २२ ते ३० वर्ष वयोगटातील असून सराईत गुन्हेगार आहेत. त्यांनी यापूर्वी ही असे गुन्हे केल्याचे कबुल झाले. सदरची कामगिरी ही जुन्नर विभागाचे उपविभागीय पोलीस अधिकारी रवींद्र चौधर यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अविनाश शिळीमकर, आळेफाटा पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक दिनेश तायडे, स्थानिक गुन्हे शाखेचे सहायक पोलीस निरीक्षक कुलदीप सपकाळ, पोलीस सबइन्स्पेक्टर अमितसिंद पाटील, आळेफाटा पोलीस ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक अमोल पन्हाळकर, पोलीस सबइन्स्पेक्टर चंद्रशेखर डुंबरे, स्थानिक गुन्हे शाखेचे अंमलदार दिपक साबळे, राजू मोमीन, संदीप वारे, अक्षय नवले, विक्रम तापकीर, निलेश सुपेकर, विनोद गायकवाड यांनी केली आहे.

# वॉटरपोलोत महाराष्ट्राच्या दोन्ही संघांना रौप्य

## महिलांत केरळ तर पुरुषांत सेनादलाला सुवर्ण



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०४, उत्तराखंड :** गतविजेत्या महाराष्ट्राच्या पुरुष वॉटरपोलो संघाला ३८व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत अगदी अखेरच्या क्षणी सुवर्णपदकाने हुलकावणी दिली अन् त्यांना रौप्य पदकावर समाधान मानावे लागले. महाराष्ट्राचा महिला संघ ही रौप्य पदकाचाच मानकरी ठरला. पुरुषांत सेनादलाने सुवर्णपदकाचा गवसणी घातली, तर महिलांत केरळने सुवर्णपदकावर नाव कोरले.

पुरुष गटाची सुवर्ण पदकाची लढत अतिशय थरारक झाली. एक एक गोलसाठी रंगलेल्या पाठशिवणीच्या खेळात मध्यंतरापर्यंत महाराष्ट्राकडे ६-५ अशी निसटती आघाडी होती. मात्र, त्यानंतर सेनादलाला मिळालेल्या दोन पेनल्टीने महाराष्ट्राचा घात केला. तब्बल १४ मिनिटांनंतर सेनादलाने प्रथमच ८-८ अशी बरोबरी साधली. मग महाराष्ट्राने पुन्हा ९-८ अशी आघाडी मिळविली. त्यानंतर सेनादलाने अखेरच्या मिनिटाच्या खेळ शिल्लक असताना महाराष्ट्राला ९-९ असे गाठल्याने लढतीत प्रचंड दबाव निर्माण झाला. नेमकी याच वेळी सेनादलाला पेनल्टी मिळाली अन् या संधीचे सोने करीत त्यांनी १०-९ फरकाने सुवर्णपदकावर नाव कोरले. महाराष्ट्राकडून भूषण पाटील व ऋतुराज बिडकर यांनी ३-३, तर श्रेयस वैद्य, अश्विनी कुमार कुंडे व उदय पवार यांनी प्रत्येकी एक गोल केला. सेनादलाकडून अंनथू जी एसने ३, तर वैभव कुथे, भागेश कुथे व अंकित प्रसाद यांनी प्रत्येकी २ गोल केले.

महिला गटाच्या अंतिम लढतीत केरळच्या बलाढ्य संघापुढे महाराष्ट्र संघाची दमछाक झाली. केरळने सुरेख पासेस आणि भन्नाट गोल करत पहिल्या झटक्यात आघाडी घेतली. मध्यंतरापर्यंतच केरळचे ८-४ अशी मोठी आघाडी घेतली होती. उत्तरार्धात ही वेगळे काही घडले नाही. केरळच्या गोलरक्षकाने महाराष्ट्राचे अनेक गोल अडवले. परिणामी शेवटी महाराष्ट्राला ७-११ गोल फरकाने पराभव पत्करावा लागल्याने रौप्य पदकावरच समाधान मानावे लागले. महाराष्ट्राकडून तन्वी मुळे हिने २, तर नंदिनी मेनकर, निम शुक्ला, राजश्री गुगळे यांना अगरवाल व कोमल किवरे यांनी प्रत्येकी एक गोल केला.

> 'मुलं अतिशय छान खेळली. त्यांनी अखेरच्या क्षणापर्यंत सुवर्णपदकाच्या आशा पल्लवित ठेवल्या होत्या. मात्र, नशिबाने आम्हाला दगा दिला. अखेरच्या क्षणी सेनादलाला पेनल्टी मिळाली अन् आम्हाला रौप्य पदकावर समाधान मानावे लागले. सेनादलानेही अतिशय चांगला खेळ केला. गतवेळी याच सेनादलाला आम्ही पेनल्टी शूट आऊटपर्यंत ताणलेल्या लढतीत पाणी पाजून सुवर्णपदक जिंकले होते. मात्र, आजचा दिवस सेनादलाचा होता, असेच म्हणावे लागेल.'
>
> – रणजित श्रोत्रीय, प्रशिक्षक महाराष्ट्र पुरुष वॉटर पोलो संघ.
>
> 'गतवेळी मिळालेल्या कांस्यपदकाचे रौप्यपदकात रुपांतर झाल्याने सहाजिकच आनंद झालाय. सुवर्णपदकाच्या लढतीत काही चुका झाल्या. मात्र, तरीही केरळच्या महिलांना सुवर्णपदकाचे श्रेय द्यावेच लागेल. महाराष्ट्राच्या संघाला केवळ १२ दिवसांचा कॅम्प मिळाला. याउलट केरळच्या महिला महिनाभर कॅम्प करून राष्ट्रीय सहभागी झाल्या होत्या. त्याचा त्यांना फायदा झाला. आता महाराष्ट्राला देखील कॅम्पवर भर द्यावा लागणार आहे.'
>
> – रणजित देशमुख, प्रशिक्षक, महाराष्ट्र महिला वॉटरपोलो संघ.

# योगासनात महाराष्ट्राच्या महिलांना सुवर्ण

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०४, उत्तराखंड :** महाराष्ट्राच्या महिलांनी उत्कृष्ट समन्वय दाखवत ३८ वी राष्ट्रीय क्रीडा स्पर्धातील योगासनात सांघिक सुवर्णपदकाची बाजी मारली. सुवर्णासह एक रौप्य व एक कांस्यपदक ही जिंकले. हेमवतीनंदन बहुगुणा स्टेडियम वर आयोजित करण्यात आलेल्या योगासन स्पर्धेमध्ये महाराष्ट्राच्या सुहानी गिरीपुंजे, छकुली सेलोकर, तन्वी रेडीज, रचना अंबुलकर व पूर्वा किनरे यांनी ११२.१३ गुण नोंदवीत सुवर्णपदक जिंकले. या खेळाडूंनी त्यांना दिलेल्या



मर्यादित वेळेमध्ये अतिशय विलोभनीय



रचना सादर केल्या त्यामुळे परीक्षकांनी त्यांना सर्वोत्तम गुण बहाल केलेच पण प्रेक्षकांनी ही त्यांचे टाळ्यांच्या गजरात अभिनंदन केले.

पुरुषांच्या कलात्मक वैयक्तिक विभागात सोलापूरचा रुपेश सांगे याला रौप्य पदक संपादन केले. अटीतटीच्या लढतीत त्याने देखील अतिशय सुरेख रचना सादर केल्या होत्या.

अखेर त्याला रौप्य पदकावर समाधान मानावे लागले त्याने ११७.८८ गुणांची कमाई केली. सुहानी हिने पारंपारिक योगासनामध्ये कांस्यपदक पटकावित आपल्या नावावर आणखी एक पदक नोंदविले. नागपूरच्या या खेळाडूने या क्रीडा प्रकारात ६०.५८ गुणांची नोंद केली.

# कु.शर्वरी भोजनकर हिचा राजभवन मुंबई येथे गौरव

**अक्षराज : चंद्रकांत भोरे**

**दि.०३, हदगाव (नांदेड) :** भगवान महावीर स्वामी २५५० निर्वान कल्याण महोत्सव समिती महाराष्ट्र शासना तर्फे दिनांक २० सप्टेंबर ते ३० सप्टेंबर या महिन्यात संपूर्ण महाराष्ट्रभर घेण्यात आलेल्या भगवान महावीर स्वामी यांच्या जीवनावर आधारित निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

सदर स्पर्धेत राज्यातील ३६ जिल्ह्यातून सुमारे १ लाख ५ हजार सरकारी, निमसरकारी आणि खाजगी शाळा मधील एकूण १ कोटी १६ लाख विद्यार्थ्यांसाठी महावीर स्वामीच्या शाश्वत कल्याणकारी तत्त्वाची देश आणि जगाला ओळख करून देण्यासाठी निबंध लेखन स्पर्धेचा मेगा इव्हेंटचे आयोजन करण्यात आले होते. प्रत्येक जिल्ह्यासाठी रोख पुरस्कार जाहीर करण्यात आले होते. आणि राज्यस्तरीय ३ पुरस्कार जाहीर करण्यात आले होते.

युनिव्हर्सल इंग्लिश मीडियम स्कूल उमरखेड या शाळेत शिकणारी व हदगाव येथील सेवानिवृत्त शिस्तप्रिय तसेच आदर्श व्यक्तिमत्त्व असलेले शिक्षक पुरुषोत्तमराव भोजनकर यांची नात आणि राज्य पुरस्कार प्राप्त आदर्श शिक्षक डॉ.प्रज्ञान भोजनकर यांची मुलगी कु. शर्वरी प्रज्ञान भोजनकर हिने १ कोटी १६ लाख विद्यार्थ्यांमधून राज्यस्तरावर शाळेचा नावलौकिक करत राज्यस्तरावर तिसरा क्रमांक प्राप्त करून (१११११११/) १ लाख ११ हजार १११ रुपयाचे पारितोषिक जिंकले.

नुकताच राज भवन मुंबई येथील दरबार दालनात महाराष्ट्र राज्याचे महामहिम राज्यपाल सी.पी.राधाकृष्णन आणि राज्याचे कौशल्य व उद्योजकता विकास मंत्री मंगल प्रभातजी लोढा यांच्या हस्ते तिला रोख रक्कम व मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले आहे. तिच्या या उत्कृष्ट लेखनाबद्दल सर्व स्तरातून तिचा गौरव करण्यात येत आहे. तिच्या या उत्तुंग यशाबद्दल खूप खूप अभिनंदन. कु.शर्वरी हिनेयशाचे श्रेय तिचे आजोबा व थोरला भाऊ पार्थ भोजनकर आत्या रोहिणी साखरकर




यांना दिले आहे.

याप्रसंगी ८३ वर्षीय भोजनकर सरांनी आपले अनुभव सांगून भगवत गीतेतील अध्याय स्थितप्रज्ञस्य का भाषा समाधिस्थस्य केशव याप्रमाणे विद्यार्थ्यांनी नियमित नम्र असावे. नम्रता हाच यशाचा मार्ग आहे संपत्तीपेक्षा संतती महत्त्वाची आहे. त्यामुळे पालकांनी आपली संतती घडवण्यासाठी प्रयत्न करावे असेही सांगितले.

# टाकळीढोकेश्वर गावाला ७७ घरकुले मंजूर; सरपंच खिलारी यांची माहिती

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०४, पारनेर (अहिल्यानगर) :** पंतप्रधान आवास योजनेंतर्गत पारनेर तालुक्यातील टाकळीढोकेश्वर गावाला विक्रमी ७७ घरकुलांना मंजुरी मिळाल्याची माहिती टाकळी ढोकेश्वर गावच्या सरपंच अरुणा खिलारी यांनी दिली. प्रधानमंत्री घरकुल योजना ग्रामीण अंतर्गत दोन टप्प्यांत १०५ घरकुलां पैकी ७७ घरकुलांना मंजुरी देण्यात आली असून ४० घरकुले मंजुरीच्या प्रक्रियेत आहेत.



आर्थिकदृष्ट्या दुर्बल असलेल्या गरजू नागरिकांचे घराचे स्वप्न घरकुले मंजूर झाल्याने होणार आहे. पंतप्रधान आवास योजनेंतर्गत आर्थिकदृष्ट्या दुर्बल असलेल्या कुटुंबाला घर मिळवून देणे, दारिद्र्य रेषेखालील कुटुंबांना स्थिर आणि सुरक्षित घरांची सुविधा पुरविणे हा या योजनेचा मुख्य उद्देश असल्याचे सरपंच खिलारी यांनी सांगितले. टाकळी ढोकेश्वर गावामध्ये घरकुलांची मोठ्या प्रमाणात मागणी होती. यापुर्वी ही काही घरकुलांना मंजुरी मिळाली.

टाकळी ढोकेश्वर ग्रामपंचायतने यावर्षी खासदार निलेश लंके यांच्याकडे वेळोवेळी पाठपुरावा केल्यानंतर मोठ्या प्रमाणावर घरकुलांना मंजुरी मिळाल्याने ७७ कुटुंबांच्या घरकुलाचे स्वप्न आत दृष्टिपथात आले असून त्यांचे जीवन साकार होऊन त्यांचे जीवनमान उंचावणार आहे. त्यांच्या जिवनात स्थैर्य येणार आहे.

यात समाधान असल्याचे खिलारी यांनी सांगितले. एकूण मंजुर घरकुलांपैकी ४० घरकुले मंजुरीच्या प्रक्रियेत आहेत. त्यासाठी लागणाऱ्या कागदपत्रांमध्ये काही त्रुटी असतील, इतर काही अडचणी असतील तर खासदार निलेश लंके प्रतिष्ठानचे अध्यक्ष बाळासाहेब खिलारी यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन सरपंच अरुणा खिलारी यांनी केले आहे.

> टाकळी ढोकेश्वर गावामध्ये घरकुलांची मागणी मोठ्या प्रमाणावर होत होती. त्यादृष्टीने सरपंच अरुणा खिलारी व ग्रामपंचायतने खा.लंके यांच्याकडे वेळोवेळी पाठपुरावा केल्याने यावर्षी खासदार निलेश लंके यांच्या विशेष प्रयत्नामुळे टाकळी ढोकेश्वर गावाला ७७ घरकुले मंजूर झाली आहेत. अजूनही ४० घरकुले मंजुरीच्या प्रक्रियेत आहेत. तेही पुढच्या टप्प्यात मंजूर करण्यात येणार आहेत. खासदार निलेश लंके यांच्या माध्यमातून पारनेर तालुक्यात प्रथमच तब्बल ४ हजार घरकुलांना मंजुरी मिळाली आहे.
>
> **- बाळासाहेब खिलारी, अध्यक्ष, निलेश लंके प्रतिष्ठान**

# डॉ.श्रीकांत शिंदे फाउंडेशन तर्फे अनोखा उपक्रम

## हृदयाला छिद्र असणाऱ्या ११५ मुलांची २डी इको तपासणी; विनामूल्य शस्त्रक्रिया करणार

**अक्षराज : तानाजी ताकतोडे**

**दि.०३, ठाणे :** डॉ. श्रीकांत एकनाथ शिंदे आणि चि. रुद्रांश यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने दिनांक ०३

फेब्रुवारी २०२५ रोजी शिवसेना वैद्यकीय मदत कक्ष, डॉ. श्रीकांत शिंदे फाउंडेशन आणि आरोग्यदूत फाउंडेशनच्या यांच्या संयुक्त विद्यमाने ठाणे येथील ज्युपिटर हॉस्पिटल मध्ये हृदयाला छिद्र असलेल्या तब्बल ११५ मुलांची २डी इको तपासणी करण्यात आली.

या उपक्रमा अंतर्गत शस्त्रक्रियेची गरज असलेल्या बालकांवर ज्युपिटर हॉस्पिटलमध्ये विनामूल्य शस्त्रक्रिया करण्यात येणार आहे. गेल्या ८ वर्षांपासून डॉ. श्रीकांत शिंदे आणि चि. रुद्रांशच्या वाढदिवसाच्या निमित्ताने हा उपक्रम सुरू असून आतापर्यंत ५ हजार बालकांवर यशस्वीरित्या शस्त्रक्रिया करून त्यांना पूर्णपणे बरे करण्यात आले आहे. या कार्यक्रमाला व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी उपस्थित राहून सर्व उपस्थित लोकांचे आभार मानले व शुभेच्छा दिल्या. तसेच इथे आलेली सर्व बालके लवकरात लवकर पूर्ण बरी व्हावी यासाठी आई जगदंबेचरणी प्रार्थना करत असल्याचे सांगितले. शिवसेना वैद्यकीय मदत कक्ष आणि डॉ. श्रीकांत शिंदे फाऊंडेशन करत असलेल्या कामाचे कौतुक करून ज्युपिटर हॉस्पिटलच्या डॉक्टर्स, नर्सिंग स्टाफ आणि तंत्रज्ञ यांचे मनापासून आभार मानले.



यावेळी माजी आमदार शहाजी बापू पाटील, डॉ. श्रीकांत शिंदे फाऊंडेशनचे अध्यक्ष विलास जोशी, शिवसेना वैद्यकीय मदत कक्षाचे अध्यक्ष मंगेश चिवटे, शिवसेना सचिव सुशांत शेलार, शिवसेना वैद्यकीय मदत कक्ष ठाणे जिल्हा प्रमुख निखिल बुडजडे, युवासेनेचे बाजीराव चव्हाण, व्याख्याते प्रा.यशवंत गोसावी, डिजी९ वृत्तवाहिनी संपादक प्रभाकर सूर्यवंशी, धर्मवीर अध्यात्मिक सेना ह.भ.प अक्षय महाराज भोसले व ज्युपिटर हॉस्पिटल डॉक्टर्स, परिचारिका, कर्मचारी वर्ग, शिवसेना वैद्यकीय मदत कक्षाचे कार्याध्यक्ष राम राऊत, माऊली धुळगंडे सर्व समन्वयक, पदाधिकारी तसेच नागरिक मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

# सकारात्मक राजकारणासाठी सशक्त माध्यमांची गरज; माध्यमे राजकारण घडवतात

**अक्षराज : स्वामी दळवी**

**दि.०३, खडकवासला (पुणे) :** काळाच्या ओघामध्ये माध्यमांचे स्वरूप जरी बदलत गेले असले तरी त्यांची भूमिका ही कायम समाजाप्रती सकारात्मकतेची असणे गरजेचे आहे. परंतु सध्या मात्र माध्यमांचा उपयोग राजकारण करण्यासाठी केला जात आहे. हे अत्यंत दुर्दैवी आहे. तरुणांमध्ये राजकारणाची सकारात्मक बाजू ठेवण्यासाठी आणि त्यांच्या माध्यमातून सकारात्मक राजकारण घडवून आणण्यासाठी सशक्त माध्यमांची समाजामध्ये गरज आहे, असे मत विविध क्षेत्रातील मान्यवरांनी व्यक्त केले.




जाधवर ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूटस तर्फे आयोजित आठव्या युवा संसद मध्ये माध्यमे राजकारण घडवतात? या विषयावर आयोजित चर्चासत्रामध्ये मान्यवर बोलत होते. ज्येष्ठ पत्रकार कमलेश सुतार इन्स्टिट्यूटचे उपाध्यक्ष ॲड. शार्दुल जाधवर आदी यावेळी उपस्थित होते. यावेळी आदर्श युवा पुरस्कार नुकतेच आयएएस झालेले ओंकार गुंडगे यांना प्रदान करण्यात आला.

कमलेश सुतार म्हणाले, माध्यमे हे पुरस्कारांपेक्षा नेहमी तिरस्कारचे धनी होतात. राजकारण हा शब्द बदनाम झाला आहे. राजकारण म्हणजे वाईट असते ही मानसिकता बदलणे गरजेचे आहे. आज मोबाईलच्या रूपामध्ये प्रत्येकाच्या हातामध्ये साधन आले आहेत. त्या साधनाचा उपयोग करून प्रत्येक जण पत्रकार होऊ शकतो. मात्र त्यासाठी समाजाप्रती आस्था असणे गरजेचे आहे.

ओंकार गुंडगे म्हणाले, निर्भयता, सामर्थ्य, औदार्य या गुणांमुळे तरुण आपले कर्तृत्व सिद्ध करू शकतात. राजकारणामध्ये या गुणांच्या तरुणांची आज समाजाला गरज आहे. तुमचा एक निर्णय समाजाचा चेहरा मोहरा बदलू शकतो. त्यामुळे राजकारणामध्ये सुशिक्षित तरुणांची गरज आहे आणि अशा प्रकारचे सुशिक्षित तरुण घडवण्याचे काम जाधवर ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट युवा संसदेच्या माध्यमातून करत आहे.

# आदर्श विद्यालय पळसपूर दहावीच्या ९७ च्या बॅचचा स्नेहमेळावा उत्साहात

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०४, पारनेर (अहिल्यानगर) :** तालुक्यातील पळसपूर येथिल आदर्श विद्यालयात १९९६- ९७ साली दहावीला शिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यांचे गेट-टुगेदर मोठ्या आनंदात आणि उत्साहात माळशेज ॲग्रो टुरिझम अँड फार्म डिंगोरे तालुका - जुन्नर जिल्हा - पुणे येथे संपन्न झाले.



तब्बल २७ वर्षानंतर हे बालपणीचे मित्र, मैत्रिणी एकत्र जमले. दहावीनंतर नोकरी व्यवसायासाठी विखुरलेली ही पाखरे स्नेहमेळाव्याच्या रूपाने एकमेकांना भेटायला आली.त्यामध्ये सर्व प्रकारच्या व्यवसायामध्ये त्या सर्वांनी आपल्या प्रगतीचा आलेख उंचावला आहे. काही शेतकरी तर काही डॉक्टर, पोलीस, शिक्षक आणि काही चांगल्या प्रकारचे व्यावसायिक पण झाले.सर्वप्रथम प्रवेशद्वाराजवळ फटाक्यांची आतषबाजी करून पळसपुर, डोंगरवाडी, शिंदेवाडी, काटाळवेढा, ढगेवाडी येथील ह्या बालमित्रांचे स्वागत करण्यात आले. नंतर नियोजनाप्रमाणे चहा पाणी झाल्यानंतर सर्वांचा सन्मान करण्यात आला. सभागृहात जमल्यानंतर आपल्याबरोबर असणाऱ्या पण आपल्याला सोडून गेलेल्या सात बालमीत्रांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. दहावीनंतरचा आपल्या प्रगतीचा आलेख कसा उंचावत गेला त्याचप्रमाणे आपण काय करतो ? कुठे राहतो ? इत्यादी बाबींवर मनोगते सादर केली. विविध क्षेत्रातील व्यक्तींनी आपल्या कार्यातून कशी समाजसेवा करता येते यावर मार्गदर्शन केले.

समाजातील प्रत्येक घटकाला वेळप्रसंगी मदत करत जा असा संदेश देण्यात आला. तद्नंतर स्नेहभोजन करण्यात आले. गाणी, गप्पागोष्टी व फोटोसेशन झाले. त्यानंतर पोहण्याचा विविध खेळांचा आणि नृत्याचा मनमुराद आनंद सर्वांनी घेतला. सर्वात शेवटी सर्वांना भेटवस्तू देऊन या कार्यक्रमाचा आभार प्रदर्शनाने समारोप करण्यात आला. सर्वांच्या जीवनातील हा एक अविस्मरणीय प्रसंग ठरला.

प्रत्येकाच्या धावपळीच्या आणि धकाधकीच्या जीवनात आनंद द्विगुणित करण्यासाठी असे कार्यक्रम होणे काळाची गरज आहे. अशाप्रकारे हा कार्यक्रम मोठ्या उत्साहात आणि जल्लोषात संपन्न झाला.

# थोडक्यात

## कलासाधना सामाजिक संस्था, नवी मुंबई तर्फे पुरस्कारासाठी प्रस्ताव पाठवण्याचे आवाहन

**अक्षराज : आदिनाथ देशमुख**

**दि.०४, कामोठे (नवी मुंबई) :** नवी मुंबई येथील कलासाधना सामाजिक संस्था तर्फे दिनांक ०८ मार्च २०२५ रोजी जागतिक महिला दिनानिमित्त क्रांतिजोती सावित्रीबाई फुले कर्तृत्व कस्तुरी पुरस्कार, क्रांतिजोती सावित्रीबाई फुले जीवन गौरव पुरस्कार, राष्ट्रीय रत्न पुरस्कार (पुरुष बांधवांसाठी) प्रदान करण्यात येणार आहेत. ह्या क्षेत्रातील व्यक्ती आपला प्रस्ताव पाठवू शकतात. वैयक्तिक, शिक्षण, शिक्षक, प्राध्यापक, खेळ, कला, चित्रपट, चित्रपटगृह, लिटरेचर, राजकारण, सामाजिक, चित्रकार, इतिहास, बँकिंग, वित्त, प्रेस, मीडिया, वैद्यकीय, लेखक, कवी, कलाकार, ललित कला, आरोग्य सेवा इतर क्षेत्रातील मान्यवर आपले नामांकन ७२०८१०१५८२ या क्रमांकावर पीडीएफ स्वरूपात पाठवण्याचे आवाहन संस्थे मार्फत करण्यात येत आहे. पुरस्कार स्वरूप आकर्षक स्मृतिचिन्ह / सन्मानपत्र / पुस्तक/ आकर्षक मेडल इ. पुरस्कार स्वरूप प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते देऊन सन्मानित करण्यात येईल.

पुरस्कारांसाठी आपले प्रस्ताव पाठविण्याचे आवाहन संस्थेमार्फत करण्यात येत आहे. या पुरस्कारांसाठी आपण आपले प्रस्ताव पाठवू शकतात. प्रस्ताव / नामांकन पाठवण्याची अंतिम दि.२० फेब्रुवारी २०२५ ही असेल. त्यानंतर येणारा प्रस्ताव / नामांकन पुरस्कारांसाठी विचारात घेतले जाणार नाहीत असे संस्थे तर्फे सांगण्यात येत आहे. नामवंत आणि प्रतिष्ठित मान्यवरांच्या उपस्थितीत नवी मुंबई येथे पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येईल. पुरस्कारासाठी निवड झालेल्या नंतर त्याबाबत माहिती देण्यात येईल. जास्तीत जास्त मान्यवरांनी या पुरस्कारासाठी आपला अर्ज करावा. असे आयोजकांमार्फत आव्हान करण्यात येत आहे.

## माघी यात्रेनिमित्त पंढरीत येणाऱ्या पालखी, दिंडी धारकांसाठी प्लॉटसची नोंदणी सुरु- इथापे

**अक्षराज : विकास सरवळे**



**दि.०४, पंढरपूर :** माघ यात्रा एकादशीचा मुख्य सोहळा दिनांक ०८ फेब्रुवारी २०२५ रोजी साजरा होत आहे. माघ यात्रेत येणाऱ्या दिंड्यांना वास्तव्यासाठी भक्तीसागर (६५ एकर) येथे जागा उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. या ठिकाणी मोफत प्लॉटस भाविकांना तंबू, राहुट्या उभारुन वास्तव्य करण्यासाठी देण्यात येत असून, पालखी, दिंडी धारकांसाठी प्लॉटसची नोंदणी सुरु आहे. दि. ०४ फेब्रुवारी पर्यंत १६५ दिंड्याची नोंदणी करण्यात आली असल्याची माहिती प्रांताधिकारी सचिन इथापे यांनी केले आले आहे. माघ यात्रेला येणाऱ्या पालख्या, दिंड्यांमधील भाविकांच्या निवाऱ्याची सोय भक्तीसागर (६५ एकर) येथे करण्यात आलेली आहे. या ठिकाणी भाविकांना निवाऱ्यासोबत पिण्याचे शुद्ध पाणी, शौचालय, वीज कनेक्शन, अन्नपदार्थ शिजवण्यासाठी गॅस वितरण, पोलीस संरक्षण, प्रथमोपचार केंद्र आदी सुविधा या ठिकाणी दिल्या जातात. या ठिकाणी एकूण ४९७ प्लॉट्सअसून त्यापैकी वापरायोग्य ४५० प्लॉटस आहेत. हे प्लॉटस भाविकांना निवाऱ्यासाठी दिले जातात. या ठिकाणी भाविकांच्या अडीअडचणी सोडवण्यासाठी आपत्कालीन मदत केंद्र स्थापन करण्यात येते. भाविकांना प्लॉटस वाटप करणे, अडीअडचणी सोडवणे, आपत्कालीन प्रतिसाद केंद्र व त्यावर नियुक्त सेक्टर मॅनेजर व त्याचे अधिनस्त कर्मचारी कार्यान्वित असणार आहेत. दिंडी, पालखी समवेत येणाऱ्या भाविकांना भक्तीसागर (६५ एकर) येथे प्लॉटसचे वाटप सुरु असून या ठिकाणी भाविकांना मुलभूत सेवासुविधा पुरवण्यात येणार आहेत. आपत्कालीन प्रतिसाद केंद्रातून भाविकांना सेवा देण्यात येणार आहे. यासाठी नायब तहसिलदार विजय जाधव (मो.क्र. ८२७५२०२१५५), सुधाकर धाईंजे (मो.क्र.९७६७२४८२१०), तसेच सहाय्यक प्रमोद खंडागळे (मो.क्र. ९६५७२९०४०३) यांच्याकडे संपर्क साधावा, असे आवाहनही प्रांताधिकारी इथापे यांनी केले आहे.

## डॉक्टर्स प्रीमियर लीगमध्ये डॉन इलेव्हन विजेता

**अक्षराज : वसंत रांधवण**



**दि.०४, अहिल्यानगर :** पारनेर तालुका मेडिकल प्रॅक्टिशनर असोसिएशन तर्फे आयोजित डॉक्टर्स प्रीमियर लीग जिल्हास्तरीय क्रिकेट स्पर्धेमध्ये अहिल्यानगर येथील डॉन इलेव्हन संघाने प्रथम क्रमांक मिळवत विजयश्री खेचून आणला. ऋपीटीएमपीए' ने आयोजित स्पर्धेमध्ये जिल्ह्यातील एकूण आठ संघांनी भाग घेतला. ३१ जानेवारी ते २ फेब्रुवारी २०२५ दरम्यान तीन दिवसांमध्ये ही स्पर्धा साईदीप क्रिकेट अकॅडमी, वाकोडी फाटा, येथे भरविण्यात आली. अटीतटीच्या स्पर्धेमध्ये द्वितीय क्रमांक पाथर्डी असोसिएशनच्या पार्थ इलेव्हन संघाने मिळवला. तृतीय राहुरी असोसिएशनच्या राहुरी इलेव्हन संघाने मिळवला. चौथा क्रमांक क्रमांक पारनेर टायगर्स संघाने मिळविला. हि स्पर्धा खेळीमेळीच्या वातावरण नगर येथे यशस्वीरीत्या पार पडली. प्रथम संघास ३१ हजार, द्वितीय क्रमांक २१ हजार, तृतीय क्रमांक १५ हजार व चतुर्थ क्रमांकास ११ हजार रुपये पारितोषिक वितरण करण्यात आले. बक्षीस वितरणास जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.बापूसाहेब नागरगोजे, संपादक प्रकाश पाटील, डॉ.कर्डिले, डॉ.सतीश सोनवणे, डॉ.राहुल पंडित उपस्थित होते.

## इटीसी केंद्रातील एसएससी विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ संपन्न

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि०४, नवी मुंबई :** इटीसी केंद्रामधून अनेक विशेष मुलेही शिक्षण प्रशिक्षण पूर्ण करत असतात. दिव्यांग मुलांना सामान्य शाळेतील दहावीचा अभ्यासक्रम पूर्ण करण्यासाठी इटीसी केंद्रातून विशेष मार्गदर्शन व विशेष शिक्षण उपलब्ध करून दिले जाते. दि.३१ जानेवारी २०२५ रोजी या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमा साठी नमुंमपा उपायुक्त शिक्षण विभाग तथा इटीसी केंद्राच्या संचालिका संघरत्ना खिलारे यांच्या समवेत नमुंमपा उपायुक्त उद्यान विभाग नयना ससाणे, नमुंमपा उपायुक्त आपत्ती व्यवस्थापन विभाग ललिता बाबर याविशेष अतिथी म्हणून उपस्थित होत्या.

या वर्षी इटीसी केंद्रातील एकूण १६ दिव्यांग मुले दहावी परीक्षेस बसणार आहेत. त्यापैकी ०१ कर्णबधीर विभागातून एक अंध विभागातून ०१ बहु विकलांग विभागातून आणि उर्वरित १३ मुलेही मतिमंद विभागातून शिक्षण घेत आहेत.